महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

दूरध्वनी क्र.(0217) - 2731011
Email ID : estsolapur@gmail.com

**महसूल आस्थापना शाखा**
पत्ता - नवीन महसूल भवन, शासकीय दुध डेअरी जवळ,
सात रस्ता, सोलापूर - ४१३ ००३

क्र.मह/आस्था-1/प्र.क्र. 61 (2023)/आरआर/ 61 सोलापूर, दि.01 /02 /2024

## जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर
## तलाठी पदभरती-2023
## निवड सूचीतील उमेदवारांसाठी सूचना

सोलापूर जिल्ह्यातील तलाठी पदाकरीता दिनांक 17 ऑगस्ट 2023 ते 14 सप्टेंबर 2023 या कालावधीत ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली असुन परिक्षेत उमेदवारांना मिळालेल्या गुणांचे सामान्यीकरण झालेनंतर अंतिमरित्या टि.सी.एस.कडून प्राप्त झालेल्या सामान्यीकृत गुणांच्या आधारे उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज सादर करतेवेळी शैक्षणिक अर्हता, सामाजिक व समांतर आरक्षण लागू असल्याबाबत त्या संबंधिची माहिती अनुषंगीक बाबींच्या पडताळणीचे अधीन राहून प्रवर्गनिहाय उमेदवारांची निवड यादी प्रतिक्षा यादी तयार करण्यात आलेली आहे.

**सदर निवड यादी व प्रतिक्षा यादी** www.solapur.nic.in **या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.**

1. निवड यादीत स्थान देण्यात आलेल्या उमेदवारांचे कागदपत्रांची तपासणीकरीता आवश्यक मूळ कागदपत्रे व मूळ कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीचे दोन संच तसेच ऑनलाईन अर्जाची डाऊनलोड केलेली प्रत घेवून या कार्यालयात **दिनांक** 08/02/2024 **रोजी सकाळी** 11.00 **वाजता** हजर रहावे व **प्रतिक्षा यादीतील कागदपत्रांच्या तपासणीबाबत नंतर अवगत करण्यात येईल.** सदर यादीतील उमेदवारांनी परीक्षा उत्तीर्ण केलेली असून गुणानुक्रमे कागदपत्र तपासणीकरीता बोलविण्यात आलेले असल्याने उमेदवारास नियुक्ती संदर्भात कोणताही हक्क प्राप्त होणार नाही याची नोंद घ्यावी.
2. सदर यादी उमेदवारांनी ऑनलाईन अर्जसादर करतेवेळी भरलेल्या माहितीवरुन तयार करण्यात आलेली असून तपासणीचे दिनांकास चूकीची / असत्य माहिती आढळल्यास कोणतेही कारण न देता संबंधित उमेदवरास अपात्र ठरविण्यात येईल.
3. समान गुण असणाऱ्या उमेदवारांतून सामान्य प्रशासन विभाग दिनांक 04/05/2022 चे शासन निर्णयातील निकषानुसार निवडण्यात आले आहेत.
4. माजी सैनिक उमेदवार यांचे सैनिकाचे प्रमाणपत्र व त्यांचे वयाबाबत सैनिक कल्याण बोर्ड यांचेकडुन तपासणी झाल्यानंतरच त्यांना नियुक्ती आदेश निर्गमीत करण्यात यईल. सैनिक कल्याण बोर्ड यांनी त्यांचा अर्ज अपात्र ठरविल्यास त्यांच्या पुढील उमेदवारांची शिफारस करण्यात येईल.
5. अंशकालीन उमेदवार यांचे अंशकालीनबाबतचे प्रमाणपत्र संबंधित तहसिलदार व जिल्हा सेवा योजना कार्यालयाकडे पाठविण्यात येवून त्यांचेकडुन प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतरच त्यांना आदेश निर्गमीत करण्यात

येईल. त्यांचे प्रमाणपत्र अवैध घोषित केल्यास अपात्र ठरविण्यात येवून त्यांचे पुढील उमेदवारांची शिफारस करण्यात येईल.

6. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्रमांक अंशका 1913 / प्र.क्र.-57 / 2013 / 16-अ, दिनांक 19/09/2013 अन्वये पदवीधर अंशकालीन उमेदवारांना आरक्षण हे समांतर आरक्षण असल्यामुळे पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरीता आरक्षित असलेल्या पदांचा अनुशेष पुढे ओढणे आवश्यक नाही. या घटकाकरीता जाहिरातीत दर्शविलेल्या आरक्षीत पदांसाठी पात्र उमेदवार उपलब्ध न झालेस ती पदे गुणवत्तेनुसार उपलब्ध अन्य पात्र उमेदवारांमधून दिनांक 16/03/1999 च्या शासन परिपत्रकातील तरतूदीनुसार विहीत केलेल्या कार्यपद्धतीचा अवलंब करुन भरण्याबाबत सूचित केलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करणेत आलेली आहे.

7. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्रमांक एसआरव्ही- 1097 / प्र.क्र.-31 / 98 / 16-अ दिनांक 16/03/1999 सदर शासन निर्णयामधील तरतुदीप्रमाणे खुल्या प्रवर्गातील (अराखीव पदे) उमेदवारांची गुणवत्तेच्या निकषानुसार निवड यादी करणेत आलेली आहे. या यादीत खुल्या प्रवर्गात गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीय उमेदवारांचाही (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, वि.जा.भ.ज., विमाप्र, इमाव व एस.ई.बी.सी) समावेश झालेला आहे. त्यामुळे निवडीचा प्रवर्ग खुला दर्शविण्यात आलेला आहे.

8. समांतर आरक्षणा अंतर्गत निवड झालेल्या उमेदवारांचे समांतर आरक्षणाबाबतचे मुळ प्रमाणपत्र व आवश्यक कागदपत्रांची पडताळीअंती नियुक्तीबाबत शिफारस करण्यात येईल.

9. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील शासन निर्णय दि.04/05/2022 भूतपूर्व दूय्म सेवा निवड मंडळाच्या कक्षेतील नामनिर्देशनाच्या कोट्यातील गट-क संवर्गातील पदे सरळसेवेने भरताना अनुसरावयाची कार्यपद्धती मधील मुद्दा क्रमांक 7 मधील (2) व (5) अन्वये परीक्षेमध्ये उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकूण गुणांच्या किमान 45% गुण मिळवणाऱ्या उमेदवारांमधून निवडसूची तयार करुन निवडसूचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार शिफारस करणेत यावी अशा सूचना आहेत. त्यानूसार कार्यवाही करणेत आलेली आहे.

दिनांक- 01 / 02 /2024

स्थळः- सोलापूर

( दादासाहेब कांबळे)
सदस्य सचिव
जिल्हा निवड समिती तथा निवासी
उपजिल्हाधिकारी सोलापूर

( कुमार आशीर्वाद भा.प्र.से.)
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी सोलापूर

# जिल्हा निवड समिती, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

# तलाठी पदभरती-2023

**या कार्यालयाद्वारे प्रसिद्ध करण्यात आलेल्या तलाठी पदभरती-2023 नुसार निवड सूचीतील उमेदवारांनी <u>कागदपत्र पडताळणीस घेवून यावयाचे कागदपत्रांची यादी</u>.**

1. संबंधित उमेदवारांची दि.08/02/2024 रोजी बायोमेट्रीक तपासणी होणार आहे, त्यामुळे तपासणी करणेकामी उमेदवार यांनी मूळ आधारकार्डसह उपस्थित राहावे.
2. संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या मुळ अर्जाची प्रिंट-आऊट. तसेच परीक्षा फी जमा केल्याचा पुरावा, तसेच परिक्षेसाठीच्या प्रवेशपत्राची प्रत.
3. भारतीय नगारिक असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Nationality)
4. महाराष्ट्र राज्याचा अधिवास असल्याबाबतचे प्रमाणपत्र (Domicile)
5. महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ माध्यमिक शालांत परीक्षा (SSC) उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र
6. महाराष्ट्र राज्य विभागीय शिक्षण मंडळ उच्च माध्यमिक शालांत परीक्षा (HSC) उत्तीर्ण झाल्याबाबतचे प्रमाणपत्र
7. मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदवी प्राप्त असल्याबाबतच्या गुणपत्रिकेची प्रत व पदवी प्रमाणपत्राची (Degree Certificate) व अर्ज सादर करण्याच्या दिनांकास इतर उच्चतम शैक्षणिक पात्रता असल्यास कागदपत्रे
8. शाळा सोडल्याचा दाखल्याची प्रत (LC/TC)
9. सामाजिक आरक्षणातंर्गत निवड झालेल्या उमेदवारांनी (मागासवर्गीय) जात प्रमाणपत्र व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र
10. ई.डब्ल्यू.एस. प्रवर्गातील उमेदवारांनी सामान्य प्रशासन विभागाचे शासन निर्णय क्रमांक राआधो 4019 / प्र.क्र. 31 / 16-अ, दिनांक 12.02.2019 अन्वये आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या पात्रतेसाठीचे प्रमाणपत्र
11. महाराष्ट्र राज्य लोकसेवा अ.जाती, अ.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागस प्रवर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिनियम 2001 (सन 2004 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक. 08) मधील कलम 4 (2) (दोन) मधील परंतुकान्वये उन्नत व प्रगत गटाचे (क्रिमीलेअर) तत्व, विजा-अ, भज-ब, भज-क, भज-ड, विमाप्र व इमाव या प्रवर्गांना लागु करण्यात आलेले आहे. त्यानुसार शासन परिपत्रक सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सी.बी.सी-10 /2006 / प्र.क्र.-15 / मावक-5 दिनांक 30/06/2006 सोबतच्या सुधारित नमुन्यात उपरोक्त प्रवर्गातील उमेदवारांनी दिनांक 31/03/2024 पर्यंत वैध असलेने उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेल्या (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र.
12. नॉन क्रिमिलेअर तत्व अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व्यतिरिक्त इतर सर्व मागास प्रवर्गांना लागू राहिल.
13. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा पाल्य असलेल्या उमेदवारांनी शासन निर्णय महसूल व वन विभाग क्रमांक एससीवाय-1205 / प्र.क्र.-189 / म-7 दिनांक 23.01.2016 अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने ज्या कुटुंबास शेतकऱ्यांच्या आत्महत्या प्रकरणी मदतीसाठी पात्र ठरविले असल्यास त्याबाबतचे कागदपत्र.

14. खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले आरक्षण महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. 82 / 2001 / मसेआ-2000 / प्र.क्र. 415 / का-2 दिनांक 25/05/2009 आणि तदनंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षण अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी दिनांक 31 मार्च 2024 पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉनक्रिमिलेअर) प्रमाणपत्र

15. अंशकालीन कर्मचारी यांनी त्यांच्या अनुभवाचे सेवा योजन कार्यालयाकडे केलेल्या नोंदणीचे प्रमाणपत्र आणि अंशकालीन कर्मचारी म्हणून कामकाज केले असल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र.

16. माजी सैनिकांनी, जिल्हा सैनिक कल्याण मंडळाकडे नाव नोंदणी केलेबाबतचे प्रमाणपत्र व सक्षम प्राधिकाऱ्यांने दिलेले सैनिक सेवे संदर्भातील प्रमाणपत्र.

17. अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूसाठी असलेले आरक्षण, शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रीधो-2002 / प्र.क्र.-68 / क्रीयुसे-02 दिनांक 01/07/2016 व प्रचलित शासन निर्णयानुसार विहीत केलेले प्रमाणपत्र धारण केलेले असावे

18. प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त उमेदवारांनी संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी (उपजिल्हाधिकारी पुनर्वसन) यांनी दिलेल्या प्रकल्पग्रस्त / भूकंपग्रस्त बाबतच्या मुळ प्रमाणपत्राची प्रत.

19. अपंग उमेदवारांनी शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र.आरईएन-2892 / प्र.क्र. 127 /ई-10 दि.10/07/2008 मध्ये नमुद व प्रचलित शासन निर्णयानुसार विहीत केलेले किमान अपंगत्वाचे प्रमाण 40% असल्याबाबतचे स्थायी वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

20. महाराष्ट्र शासन माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि.) विभागाकडील शासन निर्णय क्रमांक मातंस- 2012 / प्र.क्र.277/39 दिनांक 04/02/2013 मध्ये नमुद केलेल्या संगणक / माहिती तंत्रज्ञान विषयक अर्हता परीक्षांपैकी कोणतीही एक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT अथवा GECT परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

21. अनाथ आरक्षणाबाबत शासन निर्णय क्र.अनाथ-२०२२/ प्र.क्र.१२२/का-०३ दि.०६/०४/२०२३ मधील तरतुदीनुसार महिला व बालविकास विभागाकडील प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

22. महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र) नियम, 2005 मधील तरतूदीनुसार गट अ ते ड मधील पदांच्या सेवा प्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

23. छायाचित्र ओळख पुरावा (ओळखपत्र/Photo Indentity Card) (आधार कार्ड, वाहन परवाना, पॅनकार्ड, निवडणूक आयोगचे निवडणूक ओळखपत्र, पारपत्र, राष्ट्रीयकृत बँकेचे खातेपुस्तक) व नजिकच्या काळातील पासपोर्ट साईज दोन फोटो.

24. उक्त सर्व कागदपत्रांची पूर्ण पडताळणी तसेच जाहिरातीत नमुद सर्व निकषांची पुर्तता झाल्यानंतर नियुक्तीबाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

वरीलप्रमाणे अ.क्र.1 ते 23 मध्ये नमूद सर्व कागदपत्रांच्या मूळ प्रती व 2 स्वसाक्षांकित झेरॉक्स प्रती घेवून उपस्थित राहावे.

**विशेष टिप :- प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या पडताळणीबाबत स्वतंत्ररित्या अवगत करण्यात येत आहे.**